|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. ९ सप्टेंबर २०२६ : आत्महत्या हे अत्यंत टोकाचे पाऊल आहे. जीवनातील पैसा, संपत्ती आणि इतर अनेक गोष्टी पुन्हा मिळविता येतात; मात्र एकदा गेलेले आयुष्य पुन्हा मिळविता येत नाही. त्यामुळे जीवनातील संकटांना घाबरून न जाता आशा, सकारात्मक दृष्टिकोन आणि लवचिकतेने त्यांचा सामना करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबईचे कुलसचिव प्रा. विलास पाध्ये यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या कला व मानव्यविद्या प्रशाळेतील मानसशास्त्र विभागातर्फे जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाच्या पूर्वसंध्येला 'आशा आणि लवचिकतेने जीवनाचा प्रवास' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले. यावेळी प्रा. पाध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थी आणि युवा पिढीसमोरील मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक आव्हानांवर प्रकाश टाकला. कौटुंबिक कलह हे आत्महत्येच्या घटनांमागील महत्त्वाचे कारण असल्याचे त्यांनी नमूद केले. बदलत्या सामाजिक परिस्थितीचा व्यक्तीच्या मानसिकतेवर होणारा परिणाम समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. राम भावसार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी श्वेता जैन आणि अविता पाटील तर आभार प्रदर्शन डॉ. गिरीज महाजन यांनी केले. कार्यक्रमास मानसशास्त्र विभागातील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी** क्र. **२**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. ९ सप्टेंबर २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात सुरू असलेल्या इंडक्शन प्रोग्राम अंतर्गत दि. ९ सप्टेंबर रोजी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्ये साहित्याचे महत्त्व व भाषांचे भविष्य' या विषयावर डॉ. अनिल डोंगरे यांचे व्याख्यान झाले.

यावेळी बोलताना प्रा. डोंगरे म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता निबंध व कविता तयार करू शकते; मात्र त्यात मानवी भावना आणि संवेदना निर्माण करता येत नाहीत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भाषेचे महत्त्व वाढले असून, या युगात साहित्याची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे. साहित्य माणसाला शोध घेण्याची प्रेरणा देते, असेही त्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विद्यार्थ्यांचे भविष्य संपवणार नसून त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल घडवू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी विद्यार्थ्यांनी भाषा व साहित्याचा अभ्यास करताना अधिक प्रगल्भपणे व्यक्त होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मैत्रीपूर्ण साधनाप्रमाणे करावा; मात्र त्यावर अवलंबून राहू नये, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी, डॉ. प्रीती सोनी, डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, निखिल तायडे, महेश सूर्यवंशी यांच्यासह संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सुकन्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले, तर महेश सूर्यवंशी यांनी आभार मानले.

---

प्रती,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता